


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे   अंक : २८६ वा   बुधवार दि. १५- जानेवारी २०२५   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

## थरारक अपघात आयशर व दुचाकी होंडा शाईनचा अपघात

### एक जागीच ठार एकाचा हात खांद्यापासून वेगळा!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाण्याकडून चिखलीकडे जात असतांना पहिल्याच वळणावर ब्रेकर च्या समोर असलेला चिखली शहरातील माऊली पेट्रोल पंपाजवळ आयशर गाडीला होंडा शाईन मोटरसायकलने धडक दिल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गणेश प्रल्हाद पवार राहणार सातगाव भुसारी असे मृतकाचे नाव आहे. तर सचिन दिनकर गायकवाड सातगाव भुसारी हा जखमी झाला आहे. गणेश प्रल्हाद पवार व सचिन दिनकर गायकवाड हे दिवठाणा येथून होंडा शाइन दुचाकी वर सातगाव भुसरी येथे घरी जात असतांना,माऊली



पेट्रोल पंपा जवळ आयशर गाडीला जोरदार धडक दिली.झालेल्या अपघातात गणेश प्रल्हाद पवार याचा खांद्यापासून हातच वेगळा झाला व तो जागीच गतप्राण झाला तर, सचिन गायकवाड याच्या छातीत, हातापायाला जबर मार लागल्याने तो गंभीर असून त्याला उपचाराकरिता त्वरित हलविण्यात आल्याची माहिती मिळालीआहे.

## दोन डॉक्टरांमध्ये वाद पेटला गुन्हा दाखल!




**जनसंचलन/बुलढाणा**

शहरातील दोन डॉक्टरांचा वाद चक्क पोलीस ठाण्यातच पोहोचला.घरातील वीज प्रकारावरून हा गोंधळ उडाला. झाले असे की, याप्रकरणी अप क्रमांक ४०/२०२५ कलम ३३३, ११५, ३५२, ३५१ (२) (३) गुन्हा नोंद झाला आहे. डॉ. यशवंत तुकाराम चवरे यांनी डॉ.अक्षय विजय टेकाळे विरोधात तक्रार दाखल केली.डॉ. यशवंत तुकाराम चवरे यांच्या मालकीचे दिविशा अपार्टमेंटमधील गाळाधारक म्हणून डॉ.अक्षय विजय टेकाळे राहतो.दरम्यान अक्षय याने घरात घुसून तुमच्या विद्युत मीटर वरून वीज का देत नाही? म्हणून वाद घातला. लोटपोट केली,शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.त्यांचे वडील विजय टेकाळे हे सुद्धा माझ्या अंगणात आले होते.अशी तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहे.

## मलकापूरमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीला वीस वर्षांची शिक्षा!

### भगवान भोपळेवर न्यायालयाचा कडक फटका!...

**जनसंचलन/मलकापूर**

मलकापूर शहरातील एका दुकानातून चॉकलेट खाल्यावर घरी परतणाऱ्या अल्पवयीन मुलीवर भगवान संतोष भोपळे या नराधमाने लैंगिक अत्याचार केला. या गंभीर प्रकरणी मलकापूर जिल्हा सत्र न्यायालयातील विशेष न्यायाधीश श्री. एल. एस. व्ही. जाधव यांनी १३ जानेवारी रोजी आरोपीस २० वर्षांचा सश्रम कारावास आणि २५,००० रुपये दंड ठोठावला. आरोपीने मुलीला घरामध्ये ओढून घेत लैंगिक अत्याचार केला, आणि पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. सरकार पक्षाच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीच्या विरुद्ध पुरावे सिद्ध झाले. न्यायालयाने आरोपीला पोक्सो कायदा, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा, आणि भा.दं.वि. कलम ३४२ अंतर्गत विविध शिक्षांचा आदेश दिला. न्यायालयाने ५१,००० रुपये दंड वसुल करणे आणि संबंधित रक्कम पीडितेला देण्याचे आदेश दिले. तसेच, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून पिडीतेला अतिरिक्त नुकसान भरपाई देण्याचा निर्णयही घेण्यात आला. ही कठोर शिक्षा समाजातील विकृत व्यक्तींना कडक संदेश देणारी आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्यांनो, पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचाही अवलंब करावा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## महारेशीम अभियानाला सुरुवात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रेशीम रथाचे उद्घाटन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या विकास व विस्तारासाठी जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ङ्गमहारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते रेशीम रथाचे उद्घाटन करण्यात आले. शेती उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, गहू, मका, ज्वारी या पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित रेशीम रथाच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, रेशीम विकास अधिकारी एन.बी. बावगे, जिल्हा रेशीम कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, रेशीम शेतीचा जास्तीत जास्त वापर जिल्ह्यात व्हावे यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्नशील राहावे. रेशीम शेती ही किफायतशीर आणि फायद्याचे नगदी पीक आहे. मलबरी रेशीम शेतीपासून पहिल्यावर्षी एकरी जवळपास तीन लाखांचे उत्पन्न मिळण्यास वाव आहे. रेशीम शेतीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळते. एक एकरातील रेशीम शेतीसाठी मनरेगा योजनेंतर्गत लाभ मिळतो. तर त्यापेक्षा जास्त एकरात रेशीम शेती करण्यासाठी केंद्र सरकारच्या समग्र सिल्क योजनेतून पाच लाखापेक्षा जास्त अनुदान मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. राज्यात तुती लागवडीव्दारे रेशीम उद्योग विकास करण्याकरिता महारेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत असून बुलडाणा जिल्ह्यात हे अभियान राबविण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा अंतर्गत ८८ गावात कार्यक्रम घेऊन गावातील शेतकऱ्यांना रेशीम शेती उद्योगाबाबत संपूर्ण माहिती देण्यात येणार आहे. रेशीम शेती उद्योगासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व सिल्क समग्र योजनेअंतर्गत आपले सरकार पोर्टलवर किंवा संबंधित तालुका कृषी कार्यालय, पंचायत समिती किंवा जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा कार्यालयास संपर्क करुन लागणारी कागदपत्रे व शुल्क भरून नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. रेशीम शेतीसाठी शासकीय अनुदान योजनाः रेशीम शेतीसाठी मनरेगा अंतर्गत तुती लागवड व किटक संगोपन गृह बांधकामासाठी एक एकराकरिता तीन वर्षात ४,१८,८१५ रुपयांचे तर समग्र सिल्क-२ योजनेंतर्गत तुती लागवड, किटक संगोपन गृह बांधकाम, किटक संगोपन साहित्य, सिंचन आणि निर्जंतुकीकरण औषधींसाठी एससी/एसटी प्रवर्गांना ४,५०,००० (९०%) रुपये व इतर प्रवर्गांना ३,७५,००० (७५%) रुपये अनुदान दिले जाते. तसेच समग्र सिल्क-२ योजनेंतर्गत एक एकरात तुती नर्सरी करण्यासाठी एससी/एसटी प्रवर्गांना १,३५,००० रुपये व इतर प्रवर्गांना १,१२,००० रुपये अनुदान तर बाल किटक संगोपन गृह बांधकामासाठी एससी/एसटी प्रवर्गांना ११,७०,००० रुपये व इतर प्रवर्गांना ९,४५,५०० रुपये अनुदान दिले जाते. नाव नोंदणी करिता लागणारे आवश्यक कागदपत्र : विहित नमुन्यातील अर्ज, जमिनीचा सातबारा व ८अ ऑनलाईन उतारा, चर्तुसोमा नकाशा, पाणी प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, मनरेगा जॉबकार्ड झेरॉक्स, रहिवाशी दाखला, अल्प-भू धारक प्रमाणपत्र, आवश्यकतेप्रमाणे जात प्रमाणपत्र, मतदान कार्ड, रेशन कार्ड, ग्राम पंचायत ठराव, रु. १०० रुपयांच्या बाँड पेपरवर करारनामा प्रत ही कागदपत्रे अर्जासोबत आवश्यक आहेत. शेतकऱ्यांनी एकात्मकि पीक पद्धतीचा अवलंब करुन शेतीवर आधारित जोडधंदा म्हणून रेशीम शेतीकडे वळावे. किमान आठमाही पाणी पुरवठा असलेल्या शेतकऱ्यांनी प्रती एकर ५०० रुपये व लागणारी कागदपत्रे आपले सरकार पोर्टलवर किंवा काही अडचणी आल्यास संबंधित विभागाकडे जमा करुन नाव नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी एन.बी. बावगे यांनी केले.

# राज्य क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन खेळाडूंचे होणार गौरव

जनसंचलन/बुलढाणा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणाद्वारे बुधवार दि.१५ जानेवारी रोजी भारत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे दुपारी ४ वाजता ऑलिंपिक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिवस राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार होणार असून विविध कार्यक्रम घेतले जाणार आहे. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे. दिवंगत खाशाबा जाधव ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी येथे १९५२ मध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती मध्ये पहिले कास्य पदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासीक कामगिरी केली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान असून नवोदित खेळाडुंना प्रोत्साहन व प्रेरणा देण्याकरीता राज्यभरात त्यांचा जन्मदिवस १५ जानेवारी क्रीडा दिन म्हणुन साजरा केला जातो. या दिवसानिमित्त जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा मंडळ, क्रीडा केंद्र, स्पोर्ट्स क्लब इत्यादींनी विविध स्पर्धेचे आयोजन व विजेत्यांना पुरस्कार वितरण, शाळेतील राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर क्रीडापटूंचे गौरव, विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडुंबाबत मार्गदर्शन, समुपदेशन, नामवंत खेळाडुसोबत संवाद साधणे आदी कार्यक्रम आयोजित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोबतच खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व क्रीडा क्षेत्रातील योगदानावर प्रकाश, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, क्रीडा प्रेमी नागरीक यांच्यासोबत करीअर संदर्भात परीसंवाद व चर्चासत्र, आपल्या संघटना, क्लब, केंद्रातील खेळाडूंना चर्चासत्र व परीसंवाद, स्पर्धा, उत्कृष्ट खेळाडूंचा गौरव व पुरस्कार देणे याप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करुन हा दिवस साजरा करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

# पतीच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटविले!

जनसंचलन/बुलढाणा

पत्नीने पतीच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिल्याची घटना १३ जानेवारी रोजी दुपारी बुलढाणा शहरालगत असलेल्या सुंदरखेड येथील तार कॉलनीत घडली. या प्रकरणी आरोपी पत्नीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे रणधीर हिम्मत गवई यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, पत्नी लता रणधीर गवई हिने अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिले. शेजाऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळवून रुग्णालयात दाखल केल्याचे तक्रारीत नमुद आहे. या प्रकरणी पोलिसांनी लता गवई हिच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहेत. यामध्ये भाजलेल्या रणधीर गवई यांच्यावर उपचार सरू आहेत


# खामगावात घरफोडी अज्ञात चोरट्यांचा ३५ हजारांवर डल्ला !

जनसंचलन/ खामगाव

स्थानिक तायडे कॉलनीतील अजय सदानंद ढोरे यांच्या बंद असलेल्या घरातून अज्ञात चोरट्यांनी ३५ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना सोमवारी उजेडात आली. तक्रारीनुसार, अजय ढोरे दिल्ली येथे कुटुंबियांसह गेले आहेत. त्यांच्या शेजारी रहिवासी गजानन मधुकर वाघ यांना त्यांच्या घराचे कुलूप तुटलेले दिसून आले. त्यांनी याबाबत ढोरे यांना माहिती दिली. त्यानंतर घरातील साहित्याची पाहणी केली असता सोन्या-चांदीचे दागिणे, रोख एक हजार ५०० रुपये असा एकूण ३५ हजार ५०० रुपयांचा



मुद्देमाल लंपास केल्याचे तक्रारीत नमूद केले. तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (ए) नुसार गुन्हा दाखल केला.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## विजय देशमुख जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीत...

# पत्रकार हल्ला विरोधी सत्यशोधन समितीच्या अध्यक्षपदी वर्णी



**जनसंचलन/बुलढाणा**

दैनिक पुढारीचे जिल्हा प्रतिनिधी विजय देशमुख बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीशी जुळले असून त्यांना पत्रकार हल्ला विरोधी सत्यशोधन समितीचे नेतृत्व करतील. श्री देशमुख हे जवळपास चार दशकांपासून पत्रकारिता करीत असून सन १९९५ मध्ये जिल्हा पत्रकार संघाच्या निवडणूकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून त्यांनी कौतुकास्पद भूमिका निभावली होती. जिल्ह्यात कुठेही कुणाही पत्रकारावर हल्ला झाला की, त्याबाबतचे सत्यशोधन करून आंदोलनात्मक भूमिका सत्यशोधन समिती घेईल. यासाठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष आणि त्याठिकाणचे समन्वयक हे सत्यशोधन समितीमध्ये पदसिद्ध सदस्य असतील. विजय देशमुख यांची पारदर्शक कार्यशैली आणि दांडगा अनुभव पाहता, त्यांच्या रूपाने एक कर्तव्यतत्पर पत्रकार बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाशी जुळला असल्याची भावना, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी व्यक्त केली आहे. सदर नियुक्ती जाहीर करतांना श्री देशमुख यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. यावेळी रणजीतसिंग राजपूत तसेच पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक राजेश डिडोळकर, कार्याध्यक्ष वसीम शेख अन्वर, उपाध्यक्ष संतोष लोखंडे, सरचिटणीस कासिम शेख, विभागीय संघटक रहमत अली आदि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही- आ सिध्दार्थ खरात

## मुलनिवासी जागृती कलामंच यांचा क्रांतीकारी गितांचा कार्यक्रम संपन्न

**जनसंचलन/मेहकर**

मुलनिवासी जागृती कलामंच यांचा क्रांतीकारी गितांचा कार्यक्रम संपन्न डोणगांव -प्रतिनिधी अनिल राठोड राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, सत्यशोधक फातेमाबी शेख, सत्यशोधक मुक्ता साळवे यांच्या संयुक्त जयंती निमित्त आयोजित समाज प्रबोधन व सत्कार समारंभ कार्यक्रमात सत्कारमूर्ती आमदार सिध्दार्थ खरात यांनी जनतेच्या भावनांचा आदर करुन त्यांच्या विश्वासाला तडा देणार नाही असे मत व्यक्त केले,

दि १३ जानेवारी रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीका, सिध्दार्थ नगर वार्ड क्रं १ मध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड विष्णू सदार सत्कारमूर्ती आमदार सिध्दार्थ खरात तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुकाध्यक्ष अनिल म्हस्के,एन आर बोरकर,चंद्रभाण शिंगणे,सुरेश आप्पा कापसे, सद्दाम शाह ,दत्ता पाटील घनवट, अर्जुनराव बाजड, प्रकाश मानवतकर,संदीप गवई,सौ रेखा खोडके, भाऊराव जावळे, गोपाल आखाडे, किशोर मोरे, सचिन गाभणे,जाहेद खान,जानकीराम सावळे अय्युब शाह अनेक मान्यवर उपस्थित होते, सर्वप्रथम दिप प्रज्वलन करुन थोर पुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले, आयोजकांच्या वतीने आ सिध्दार्थ खरात यांचा फटाक्यांच्या आतिषबाजी करुन भव्यदिव्य सत्कार करण्यात आला, उपस्थित मान्यवरांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले, प्रास्ताविक मनोगतातून भारत मुक्ती मोर्चा विभागीय प्रभारी भागवत जाधव यांनी समाजाची दशा व दिशा यावर लक्ष्य वेधले, आ सिध्दार्थ खरात यांनी आपल्या सत्काराला उत्तर देत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करुन रोजगार व शिक्षण या बाबी कडे



गांभीर्याने विचार करुन प्रगती कडे वाटचाल करु,शिका,संघटीत व संघर्षातुनच जिवनमान बदलुया,असे ते म्हणाले, यावेळी देवेंद्र सिरसाठ व मुलनिवासी जागृती कलामंच यांचा क्रांतीकारी बहारदार गितांचा कार्यक्रम संपन्न झाला, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा गजानन सातपुते तर आभार दत्ता बोरकर यांनी मानले,

कार्यक्रम यशस्वीतेसाठी दत्ता शेळके, राहुल बोरकर,राजु नवघरे,संदीप वाकोडे,वामन तेलगोटे,विकास पोहरे,सह सिध्दार्थ नवयुवक मंडळ, पंचशील नवयुवक मंडळ,हजरत टिपु सुलतान सामाजिक फाऊंडेशन च्या युवा कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले,

# पत्रकार गणेश निकम यांची प्रदेश प्रतिनिधी म्हणून निवड

## बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचा वैचारिक विस्तारही सुरु

**जनसंचलन/बुलढाणा**

प्रख्यात साहित्यीक, विचारवंत तसेच दै. अजिंक्य भारतचे जिल्हा प्रतिनिधी गणेश निकम यांची बुलढाणा जिल्हा पत्रकार संघातर्फे मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचा मागील दहा दिवसांपासून सर्व स्तरावर विस्तार सुरु आहे. नवीन कार्यकारिणीने पहिल्या दिवसापासून विविध उपक्रम राबविण्यासोबतच पत्रकारिता समृद्ध करणारे आणि समाजाला दिशा देणारे कार्यक्रम आयोजित केले आहे. त्यामुळेच बुलढाणा जिल्हा पत्रकार संघासोबत दररोज अनेक चांगले पत्रकार जुळत आहेत. आज, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची बैठक जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. दोन प्रदेश प्रतिनिधी संघातर्फे निवडले जातात. यापूर्वी निवडले गेलेले प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ यांनी दुसऱ्या प्रतिनिधी पदासाठी गणेश निकम यांचे नाव सुचविले. या नांवावर संपूर्ण कार्यकारिणीने एकमताने शिक्कामोर्तब केले. सन १९८८ पासून श्री निकम पत्रकारितेत आहेत. ग्रामिण पत्रकारितेपासून सुरुवात केलेल्या गणेश निकम यांनी अल्पावधीतच राज्यस्तरीय पत्रकारितेपर्यंत झेप घेतली. त्यांना आतापर्यंत विविध सामाजिक आणि पत्रकारितेला समर्पीत पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. गणेश निकम यांच्या रूपाने बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या प्रतिष्ठेत वैचारिक भर पडली असल्याचे मत जिल्हाध्यक्ष श्री राजपूत यांनी व्यक्त केले आहे. प्रदेश



प्रतिनिधी पदी निवड झाल्याबद्दल श्री निकम यांचा कार्यकारिणीच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रदेश प्रतिनिधी युवराज वाघ,सरचिटणीस कासिम शेख, महिला जिल्हाध्यक्ष कु. मृणाल सावळे,कार्याध्यक्ष वसीम शेख अन्वर, उपाध्यक्ष रविंद्र गणेशे, तथा विभागीय संघटक रहमत अली आणि यांनी श्री निकम यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाची उर्वरित कार्यकारिणी उद्या, १५ जानेवारी रोजी दुपारपर्यंत घोषित करण्यात येणार आहे, हे विशेष.

# सिंदखेड राजात स्त्री शक्ती केंद्र व्हावे- संदीप शेळके

**जनसंचलन/ सिंदखेड राजा**



मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे राष्ट्रमाता जिजाऊ स्त्री शक्ती केंद्र झाले पाहिजे. ज्यामधून जिजाऊंचा आदर्श घेऊन महिला, युवती पुढे येतील. स्त्री शक्ती केंद्राच्या मागणीसाठी राज्यकर्त्यांना जिजाऊ सद्बुद्धी देवो, अशी प्रार्थना शिवसेना (उबाठा) जिल्हा समन्वयक तथा वन बुलढाणा मिशनचे संस्थापक संदीप शेळके यांनी केली. राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त १२ जानेवारी रोजी सकाळी त्यांनी राजवाड्यात जिजाऊंचे दर्शन घेतले. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले नवीन वर्ष बळीराजासाठी सुखा- समाधानाचे, आनंदाचे जावो. त्यांच्या जीवनात समृद्धी येवो. तसेच कापूस, सोयाबीन यासह इतर शेतमालाला चांगला भाव मिळून शेतकरी सुखी व्हावो, अशी प्रार्थना त्यांनी जिजाऊ चरणी केली. वन बुलढाणा मिशन ही जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास असलेली एक लोकचळवळ आहे. विकासाच्या बाबतीत आपला बुलढाणा जिल्हा अव्वलस्थानी पोहचला पाहिजे याकरिता आपणास काम करायचे आहे. मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे स्त्री शक्ती केंद्र झाले पाहिजे अशी मागणी आपण वन बुलढाणा मिशनच्या माध्यमातून केलेली आहे. येणाऱ्या काळात सुद्धा आपण ही मागणी सातत्याने लावून धरणार असल्याचे संदीप शेळके यांनी सांगितले.

# नगरपालिकेच्या तत्परतेमुळे बाजार लाईनमध्ये मोठा अग्नितांडव टळला!

जनसंचलन/बुलढाणा

शहरातील बाजार लाईन परिसरात सोमवारी दुपारी मोठा अनर्थ टळला. न्यायालयाच्या मागील भागातील जिल्हा परिषद ग्राउंडजवळ कचऱ्याला लागलेल्या आगीने काही क्षणांतच मोठा पेट घेतला. या आगीमुळे परिसरातील खान कॉम्प्लेक्ससमोरील दुकाने आणि रस्त्यावरील छोटे-मोठे व्यापारी मोठ्या संकटाच्या सावटाखाली आले होते. आग वेगाने पसरत असल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. तसेच परिसरातील सतर्क नागरिकांनी वेळेवर मदत केल्याने मोठी हानी टळली. जर ही आग वेळीच आटोक्यात आणली नसती, तर परिसरातील दुकाने आणि इमारतींना मोठे नुकसान झाले असते. स्थानिक व्यापाऱ्यांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले असून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी कचरा व्यवस्थापन अधिक मजबूत करण्याची मागणी केली आहे.



## बालकामगार ठेवणाऱ्यांवर संक्रांतवर जिल्हाधिकाऱ्यांची विशेष मोहीम!

# चिखलीत अमोल खबुतरेवर गुन्हा दाखल!

जनसंचलन/बुलढाणा




बालकांना कुठल्याही कामावर लावण्याची परवानगी नसताना, जिल्ह्यात विविध कामाच्या ठिकाणी बाल कामगार आढळून येतात. अशा बालकांच्या सुटकेसाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने धाडसत्र राबविण्यात येत आहे.एक कृतीदल पथक गठीत करण्यात आले असून, या पथकाने विशाल मोटर्स मेन रोड शिवाजी महाराज पुतळा चिखली येथे धाड टाकून कारवाई केली. अमोल सुरेश अप्पा खबुतरे असे त्या मालकाचे नाव आहे. जिल्ह्यात कामाच्या अनेक ठिकाणी अचानक धाड टाकण्यात येणार असल्याची माहिती आहे. जिल्ह्यातील हॉटेल, दुकाने, बांधकाम व विटभट्टी अशा ठिकाणी बालकामगार दिसून येतात. बालकामगार ठेवणे ही बाब कायद्याने गुन्हा असताना- ही काही मालक, ठेकेदारांमार्फत कमी वयातील मुलांकडून काम करुन घेण्याची प्रथा आहे. या प्रथेवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष मोहिम आखण्यात आली आहे. आरोपी अमोल सुरेशअप्पा खबुतरे शिवाजी चौक चिखली (विशाल मोटर्स) यांचेवर किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ चे कलम ३ व सुधारणा २०१६ चे कलम ३ व भा.न्या. सं व जे जे ॲक्ट २०१५ अंतर्गत कलम७७,७९ कलम १४६ नोंद करण्यात आला. आरोपीने बाल कामगारांना त्यांचे आस्थापनामध्ये कामाला ला-वले आहे,असे आढळुन आले आहे.

## गजानन महाराज मतिमंद विद्यालयातील जेवणातून विषबाधा

# एका विद्यार्थ्याचा मृत्यू, १५ हून अधिक विद्यार्थी आजारी

जनसंचलन/शेगाव



शेगावच्या गजानन महाराज मतिमंद निवासी विद्यालयात काल विद्यार्थ्यांना दिलेल्या जेवणातून विषबाधा झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. जेवणानंतर काही विद्यार्थ्यांना उलट्या, जीव मळमळणे आणि मोशनमध्ये रक्त येण्याची लक्षणे दिसू लागली. एकूण १५ - २० विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रकरण गंभीर बनल्यानंतर तह-सीलदार दीपक बाजड, एसडीओ रामेश्वर पुरी, आणि शेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार नितीन पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत त्वरित कारवाई केली. डॉक्टर अमोल नाफडे यांच्या नेतृत्वाखाली उपचार सुरू करण्यात आले असून, काही गंभीर विद्यार्थ्यांना अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे. दुर्दैवाने, आधीपासून आज-ारी असलेल्या एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची दु:खद घटना घडली असल्याची माहिती मिळत आहे. शाळेचे मुख्याध्यापक, संस्थापक आणि परिचारिका यांच्या हलगर्जीपणामुळेच हा प्रकार घडला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त होत आहे. शाळेतील व्यवस्थापनाविरोधात तक्रारीचा सूर उठत असून, दोषींवर कडक कारवाईची मागणी होत आहे.





